

**खामुंडी (ता. जुन्नर) येथे सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करताना बी. जे. महाविद्यालयाचे विद्यार्थी.**

# खामुंडी येथे सायबर जनजागृती

**ओतूर :** खामुंडी (ता.जुन्नर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षिततेची सामूहिक शपथ घेतली. बी.जे. महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पांतर्गत गौरी भालेराव व वैष्णवी डुंबरे यांनी जि. प . प्राथमिक शाळा व हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना सामूहिक सायबर सुरक्षेची शपथ दिली. सायबर सुरक्षेविषयी या वेळी सखोल माहिती देण्यात आली. क्विक हिल फाउंडेशनच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

Scanne